**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०६ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **जगातल्या सर्वात उंच कमानीवरच्या पुलाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन/ जम्मू काश्मीरमधे ४६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं केलं लोकार्पण.**
2. **भारतीय रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढाव्यात रेपो दरात अर्धा टक्के कपात.**
3. **नीट परीक्षा येत्या ३ ऑगस्टला एकाच सत्रात घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची परवानगी.**
4. **छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक दिन सोहळा विविध कार्यक्रमांनी साजरा.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी- चिनाब पुलाचं उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू-काश्मीर दौऱ्यात जगातला सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. तत्पूर्वी त्यांनी संपूर्ण पुलाची पाहणी केली. तसंच त्यांनी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक आणि चिनाब पूल निर्मितीत सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. चिनाब नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला रेल्वे पूल हा जगातला सर्वात उंच रेल्वे कमानीवरचा पूल आहे. एक हजार ३१५ मीटर लांबीचा हा पूल स्टीलपासून तयार केला आहे. देशातला सर्वात उंचीवरचा केबलवरचा पूल असलेल्या अंजी पुलाचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते झालं. या वेळी आयोजित सभेत उपस्थितांना संबोधित करताना मोदी यांनी जम्मू काश्मीर मध्ये होत असलेल्या विकास कामांना या ठिकाणचे नवीन सामर्थ्य असल्याचं म्हणाले-

***उधमपुर, श्रीनगर, बारामूला ये रेल लाइन प्रोजेक्ट ये सिर्फ नाम नहीं है, ये जम्मू कश्मीर के नए सामर्थ्य की पहचान है। यहाँ जम्मू में नए मेडिकल कॉलेज का शिलान्यास हुआ है। 46,000 करोड़ रुपये के प्रोजेक्टस जम्मू और कश्मीर के विकास को नई गति देंगे।***

पंतप्रधानांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर त्यांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबर गाडीने प्रवास केला. या ठिकाणी होणाऱ्या जाहीर कार्यक्रमात ४६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येत आहे.

11 वर्ष-संस्कृतीच्या वैभव

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. त्यात आज, आज आम्ही देशाच्या संस्कृतीच्या वैभवाची स्थापना करणाऱ्या सांस्कृतिक वारसा संवर्धनाच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकत आहोत. यावर आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी........

*गेल्या दशकात भारताचा सांस्कृतिक प्रवास सर्व दिशांनी विस्तारला आहे. हंपीच्या कालातीत मंदिरांपासून ते शास्त्रीय संगीत आणि नृत्याच्या जीवन परंपरापर्यंत, सरकारने मूर्त आणि अमूर्त वारशांना नवीन ऊर्जा दिली आहे. अयोध्येतील राम मंदिर श्रद्धा आणि राष्ट्रीय एकतेचे प्रतीक म्हणून स्थापित केले आहे, तर वाराणसीतील काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर प्रकल्पाने प्रतिष्ठित काशी विश्वनाथ मंदिराला थेट गंगा नदीशी जोडून यात्रेकरूंचा अनुभव आनंददायी बनवला आहे. जागतिक दर्जाच्या सुविधा आणि आध्यात्मिक वातावरण प्रदान करण्यासाठी उज्जैनमधील महाकाल लोक प्रकल्प सुरू करण्यात आला. दुसरीकडे, हिमालयातील केदारनाथ आणि बद्रीनाथ धामच्या पुनर्स्थापनेद्वारे, या पवित्र मंदिरांना भेट देणाऱ्या यात्रेकरूंसाठी पायाभूत सुविधा आणि सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. या प्रयत्नांना पुढे नेत, हृदय योजनेद्वारे १२ वारसा स्थळे विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. एकत्रितपणे, हा उपक्रम भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करत आहे आणि देशभरात पर्यटनाला चालना देत आहे. भारताने परदेशातून ३५० हून अधिक शिल्पे आणि कलाकृती यशस्वीरित्या परत आणल्या आहेत. ज्यामुळे लोकांना देशाच्या अमूल्य वारशाची जाणीव झाली आहे.*

रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज व्दैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. पतधोरण समितीनं रेपोदरात अर्धा टक्के कपात केली आहे. आता रेपोदर साडेपाच टक्के झाला आहे. SDF दर सव्वापाच टक्के तर बँकदर पावणेसहा टक्के झाला आहे. आर्थिक वर्ष २०२६ साठी महागाई दर ४ टक्क्यांवरून कमी करून ३ पूर्णांक ७ दशांश टक्यांवर आणण्यात आला आहे तर चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. पतधोरण समितीची पुढील बैठक ४ ते ६ ऑगस्ट २०२५ दरम्यान होणार आहे. आरबीआयनं व्दैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर शेअर बाजारात तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६६६ अंकांनी वाढून ८२ हजार १०८ अंकांवर व्यवहार करत आहे तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२६ अंकांनी वाढून २४ हजार ९७६ अंकांवर व्यवहार करत आहे.

इंडेक्स कार्ड

केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक संपल्यानंतर जाहीर करण्यात येणारी आकडेवारी विषयक विविध अहवाल जलद गतीनं तयार करण्यासाठी इंडेक्स कार्ड ही एक नवी अद्ययावत प्रणाली सुरू केली आहे. इंडेक्स कार्ड ही निवडणूक आयोगाची मात्र कायद्यानं बंधनकारक नसलेली माहितीप्रणाली असेल. या माध्यमातून निवडणुकीनंतरची महत्त्वाची आकडेवारी संकलित केली जाईल. संशोधक, शिक्षणतज्ञ, धोरणकर्ते, पत्रकार आणि सामान्य नागरिकांना मतदार संघ निहाय माहिती सुलभतेनं उपलब्ध व्हावी, हा या मागचा हेतू असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. या इंडेक्स कार्डमध्ये उमेदवार, मतदार, मतदानाची टक्केवारी, मतमोजणीचा तपशील, पक्ष आणि उमेदवारांना मिळालेली मते, लिंगभावानुसार मतदानाचं स्वरूप, प्रादेशिक स्तरावरचा फरक आणि राजकीय पक्षांची कामगिरी या आणि अशा स्वरुपाची माहिती मिळू शकणार आहे.

नीट प्रवेश परीक्षा

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय परीक्षा मंडळाला ३ ऑगस्ट रोजी एकाच सत्रात नीट प्रवेश परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. याआधी ही परीक्षा १५ जूनला होणार होती. मंडळानं ३ जून रोजी परीक्षा केंद्रांची संख्या दुप्पट करणं आणि सुरक्षा व्यवस्थेसाठी वेळ वाढवण्याची मागणी करणारा अर्ज दाखल केला होता. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं सुरुवातीला परीक्षा घेण्यासाठी मंडळानं मागितलेल्या दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. मात्र नंतर ३ ऑगस्ट रोजी नीट परीक्षा घेण्यामागची कारणं योग्य असल्याचा निर्वाळा न्यायालयानं दिला. नीट परीक्षा घेण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा मंडळाला आणखी वेळ दिला जाणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

राज्याभिषेक दिन सोहळा

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज रायगड किल्ल्यावर साजरा होत आहे. आज सकाळी पारंपारीक पद्धतीनं शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरूवात झाली. संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती आणि दुर्गराज रायगड यांच्या वतीनं शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांसाठीच प्रेरणा स्थान आहे. शासन प्रशासना पासून ते जलसंधारण, पर्यावरणा पर्यंत साऱ्यांच विषयात त्यांनी केलेल कार्य हे आजही शिकण्यासारखं आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण खाते अंतर्गत येणाऱ्या सर्वच शासकीय

औद्योगिक शिक्षणामध्ये शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे त्या अनुषंगाने नागपुरातील संत जगनाडे महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर इथं शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळेला एका व्हिडिओ क्लिप च्या माध्यमातून त्यांनी सांगितले पाच विषयाची निवड करून त्यावर नामवंत व्यक्त्यांची व्याख्याने राज्यभरातील आयटीआय मध्ये आयोजित करण्याचा हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिकवणीला अनुसारून असल्याचे ते म्हणाले. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हवामान

विदर्भात आज, उद्या आणि परवा बहुतांशी जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. उद्या संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, आज सर्वाधिक कमाल तापमान नागपूर इथं 39 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर किमान तापमान अमरावतीत 24.8 सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

क्रिकेट

भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर आज रवाना झाला. या दौऱ्यात ५ कसोटी सामने होणार असून ते २०२५-२०२७ च्या आयसीसी जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेचा भाग आहेत. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गज क्रिकेटपटूंनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरचा हा भारतीय संघाचा पहिलाच कसोटी दौरा आहे. शुभमन गिल कडे नेतृत्वाची धुरा आहे.

*****